Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 3, Sept 2012
ISSN:-2231-5063

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

विदर्भातील स्त्रीवादी चळवळीच्या नेत्या डॉ. सीमा साखरे यांच्या 'बाई' या काव्यसंग्रहातून प्रत्ययास येणाऱ्या भारतीय स्त्री जीवनाच्या व्यथा आणि कथा : एक समीक्षा

सुनीता सरायकर

वसंतराव नाईक शासकीय कला
व समाजविज्ञान संस्था,
नागपूर.

प्रस्तावना :—

सबाल्टर्न हया संज्ञेने प्रसिध्दिस आलेला इतिहासलेखन प्रवाह भारतात विसाव्या शतकाच्या अखेरच्या वीस वर्षात प्रचलित झाला. हया प्रवाहाने परंपरागत इतिहास लेखनाला छेद देऊन हया क्षेत्रात नवी आव्हाने उभी केली. इतिहास लेखनासाठी नवी क्षितिजे खुली केली व भारतीय इतिहास लेखनाला नवी दिशा व नवा आयाम देऊन नव्या पर्वाचा प्रारंभ केला. सबाल्टर्न प्रवाहाचा तात्विक आधार अन्तोनिओ ग्रामची या इटालियन विचारवंतांच्या लिखाणात आढळून येतो.

ग्रामचीच्या मतानुसार सत्ताधीश अंकित वर्गावर आपले वर्चस्व कायम ठेवण्यासाठी दोन मार्गाचा अवलंब करतात. पहिला मार्ग दमनाचा तर दुसरा मार्ग संमतीचा असतो. दमन मार्गानी म्हणजे कायदा, दण्डयंत्रणा, पोलीस यंत्रणा इत्यादींनी वर्चस्व स्थापित केले जाते, तर दुसरा मार्ग म्हणजे अंकितांच्या बौध्दिक, मानसिक व सांस्कृति जाणिवांना सोयीस्करपणे प्रभावित करून आपल्या शासनाला त्यांची मान्यता मिळविली जाते. अशी मान्यता मिळविण्यासाठी शास्ता वर्ग आपल्या हितसंबंधाना पोषक ठरतील असे विचार श्रध्दा, मूल्ये प्रसृत करून अंकितांच्या जाणिवात अंतर्बाहय परिवर्तन घडवून आणतो यातून नवे जीवनदर्शन, नवी संस्कृती निर्माण करतो व ती संस्कृती अंकित वर्गाला आपलीच संस्कृती आहे असे वाटू लागते. अंकित वर्गावर बौध्दिक व सांस्कृतिक प्रभाव प्रस्थापित करण्याचे कार्य शासक वर्ग समाजातील काही विचारवंतांना हाताशी धरून करून घेतो. त्यांच्यामार्फत शिक्षण, धर्म, साहित्य, सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून शासकांना हितकारक असणारी मूल्ये रूजविली जातात. भारतात आर्यांच्या आगमनानंतर पितृसत्ताक पध्दती समाजात रूजवितांना याच पध्दतीचा उपयोग केला. पितृसत्ताक पुरूषप्रधान समाजात स्त्रीला गौण स्थान प्राप्त झाले.

परंतु समाजात अशा विचारवंताप्रमाणे सेंद्रिय बुध्दिवंतांचा लहान गटही असतो. सर्वसामान्य लोकांना प्रचलित मूल्ये घातक आहेत, अन्यायकारक आहेत, शोषक आहेत हयाची जाणीव होऊ लागताच सेंद्रिय बुध्दिवंतांचा वर्ग अंकितांना हे पटविण्याचा प्रयत्न करतो. शासकांच्या अन्याय धोरणाची जाणीव झालेल्यांच्या प्रतिकाराच्या अभिव्यक्तीला हा वर्ग वैचारिक बैठक देतो, नवी सांस्कृतिक मूल्ये निर्माण करतो. प्रस्थापित मूल्यव्यवस्थेला प्रतिसंस्कृतीचे आव्हान उभे करतो व त्या संघर्षातून नव्या वैचारिक युगाचा आरंभ होतो. वैदिक धर्मातील कर्मकांडांच्या विरोधात चार्वाक व बुध्दाने असे प्रतीआव्हान निर्माण केले होते. आधुनिक काळात स्त्रीवादी चळवळीने असे आव्हान निर्माण केले आहे.

भारतात स्त्रियांच्या अस्तित्वाला नवा अर्थ देणारी स्त्रीवादी चळवळ विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात प्रभावीपणे काम करू लागली. स्त्रियांच्या समस्यांच्या अनुषंगाने स्त्रीवादी चळवळीने समाजाता सतत निकराचे धक्के दिले. पुरूषप्रधान समाजढाचाला स्त्रीवादी चळवळीने नवे आव्हान दिले. महाराष्ट्रात स्त्रीवादाची वैचारिक बैठक इ.स. 1882 साली ताराबाई शिंदे यांनी स्त्री–पुरूष तुलना हे क्रांतीकारक विचारप्रक्षोभक पुस्तक लिहून स्त्रीवादी विचारांचा पाया घातला. ताराबाई शिंदे या विदर्भकन्या होत्या. ताराबाईच्या विचारानेच प्रेरित होऊन दुसरी विदर्भकन्या डॉ. सीमा साखरे यांनी स्त्रीवादी विचार प्रसारित करण्यासाठी स्त्रियांच्या सामाजिक न्यायाची कृतिशील चळवळ इ.स. 1975 पासून सातत्याने चालवून गरीब व सामान्य स्त्रियांसाठी त्यांच्या समस्या मांडण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून दिले. स्त्रीवाद ही एक राजकीय जाणीव आहे. तो एक सम्यक परिवर्तनवादी दृष्टीकोन आहे.

महाराष्ट्रात महात्मा ज्योतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासारख्या नेत्यांनी समाजातील शोषित पिडीत अशा घटकांमध्ये जागृती निर्माण केली. त्याला बोलते केले. स्त्रियांच्या प्रश्नाला सर्वात प्रथम वाचा फोडली ती महात्मा फुले यांनीच. त्यातून सामान्यांचा इतिहास रेखाटला जाऊ लागला. यातूनच लोकइतिहास ही कल्पना उदयास आली. महात्मा फुले हे पहिले स्त्रीवादी इतिहासकार आहेत. कवयित्री वरील

Please cite this Article as : *सुनीता सरायकर, विदर्भातील स्त्रीवादी चळवळीच्या नेत्या डॉ. सीमा साखरे यांच्या 'बाई' या काव्यसंग्रहातून प्रत्ययास येणाऱ्या भारतीय स्त्री जीवनाच्या व्यथा आणि कथा : एक समीक्षा* **: Golden Research Thoughts (Sept ; 2012)**

दोन्ही नेत्यांनी दिलेल्या देणगीवर कृतज्ञता व्यक्त करतांना लिहितात,

''दिली नसती न्यायाची आणि बंडाची दीक्षा तुम्ही
तर ज्योतीबा कशा जगलो असतो आम्ही?''

इतिहासाचे अवलोकन सामान्यांच्यात हिंडून त्यांच्या भावभावना जाणून घेऊन त्याचे योगदान नोंदवावे असा विचार सुरू झाला. भारतात रणजितगुहा, गायत्री चक्रवर्ती यांनी या पध्दतीने ग्रंथलेखन केले. इतिहासाच्या मंचावरील सामान्य घटकाचे अस्तित्व केंद्रस्थानी ठेवून जर लेखन केले तर सामान्यांचा इतिहास प्रभावी ठरतो. हे सूत्र मध्यवर्ती ठेवून डॉ. सीमा साखरे यांनी 'बाई' या नावाने लिहिलेला काव्यसंग्रह अभ्यासण्याचा प्रयत्न या शोधनिबंधातून केला आहे. कवयित्रीच्या अनुभवाचे विश्व अमर्याद आहे. हे अनुभव स्त्रीजीवनाशी जुळलेले आहेत. स्त्री जीवनातील दाहक सत्य सर्वांनाच अंतर्मुख करणारे आहे. कवयित्रीने स्वतः अनुभवलेले जग आपल्या लेखनात वस्तुनिष्ठपणे मांडले आहे. कवयित्री पुरोगामी विचारांच्या आहेत. त्यांची तीक्ष्ण बुध्दिमत्ता, तरल संवेदनशीलता, त्यांचे बाणेदार आणि तडफदार व्यक्तिमत्व, त्यांची निर्भयता, सूक्ष्म निरीक्षणशक्ती आणि मराठी भाषेवरचं प्रभुत्व वादातील आहे. इ.स. 1950 ते 1975 या काळातील त्यांचा तारूणतल्या जीवनप्रवास स्त्रियांची दुरावस्था आणि दुर्दशा पाहतच झाला. त्यावेळी स्त्रियांच्या दुःखाची दखल घेतली जात नव्हती. म्हणून स्त्रियांच्या दुःखाला वाचा फोडण्यासाठी त्यांनी लेखणी हाती घेतली. जे डोळयांनी पाहिलं, जे अनुभवलं तेच त्यांनी आपल्या लेखनात उतरवलं.

समाजातील स्त्रीचे स्थान हे प्रामुख्याने संस्कृतीचा दर्जा व समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा सर्वसाधारण दृष्टिकोन यावर अवलंबून असतो आणि संस्कृती सर्वसाधारण दृष्टिकोण हा सामाजिक तत्वज्ञान व समाजात विकसित झालेल्या सामाजिक संस्था यावर अवलंबून असतो. म्हणूनच त्या 'माणूस म्हणून जगण्याचे स्वप्न' या कवितेते लिहितात,

''इथे मुलगी जन्माला येऊ नये याचे शास्त्र आहे
जन्मलेल्या नवजात मुलीला, मारण्याचे तंत्र आहे
पतीच्या प्रेताबरोबर स्त्रीला, जीवंत जाळण्याचे मंत्र आहे
स्त्री जगणे मरणे चाकोरीत ठेवणारे, संस्कृती नावाचे यंत्र आहे.''

विवाहाचे व्यापारीकरण होणे, त्यातून हुंडा पध्दती विस्तारीत होणे, हुंडा बळींची संख्या वाढणे हा सर्वच घटनाक्रम म्हणजे स्त्री जीवनाची शोकांतिकाच होय.

'पितृसत्ता आणि आम्ही' या कवितेत कवयित्री पितृसत्तेला तुरूंगाची उपमा देतात. पिता, भाऊ, पती, मुले सारे तिच्यावर पाळत ठेवणारे चौकीदार असतात जे स्वतःच्या स्वार्थाकरिता स्त्रीला हवी तशी राबवितात. शिक्षणापासून स्त्रीला वंचित ठेवून तिला परावलंबी जीवन जगायला लावून सततचे अपंगत्व तिच्यावर लादले जाते. पुरूषसत्ताक पध्दती बाईला न्याय देऊ शकत नाही. हे सत्य कवयित्रीला उमगले आहे म्हणूनच त्या आपल्या 'पावसाला सुपारी' या कवितेत लिहितात,

''सारी मूल्यव्यवस्थाच त्यांच्यासाठी आहे
म्हणून तर ते बाईला फरफटत आहेत.''

'आई' या कवितेत कवयित्री आपल्या आई विषयी लिहितात, बायकांनी असेच जगायचे असते असे म्हणणारी त्यांची आई आतल्या आत घुसमटत राहिली. कष्टांच्या आगीत जळत राहिली. तिच्या कष्टांची दखल कोणी घेतली नाही. पण मेली तेव्हा मात्र लोकांनी तिची संत म्हणून अंत्ययात्रा काढली. कारण काय तर ती ज्ञानेश्वरी हातात असतांना मेली. यावर कठोर प्रहार करतांना कवयित्री लिहितात,

''जगण्यापेक्षा मरणावर लक्ष देणाऱ्या
मूल्यांची मला मनोमन खंत वाटली!''

या ओळी भारतीय समाजाच्या सांस्कृतिक मूल्यांवर प्रहार करणाऱ्या आहेत. पुढे त्या लिहितात,

''बाई खरं बोलली तर!
तर संस्कृतीचे निघतील वाभाडे
बाई खरं बोलली तर!
नात्यागोत्याचं पितळं पडेल उघडे
बाई खरे बोलली तर
अधिकाऱ्यांचे निघतील धिंडवडे!''

'बाई' या कविता संग्रहात स्त्रियांच्या छळाच्या असंख्य कहाण्या आहेत. यात जळणाऱ्या असंख्य स्त्रिया आहेत. कष्टातच जगणारी व कष्टातच मरणारी आई आहे. घरी, दारी काबाडकष्ट करून घर चालविणाऱ्या व आयतोबा नवऱ्याला पोसणाऱ्या, तरीही नवऱ्याच्या हातचा मार खाणाऱ्या कष्टकरी बाया आहेत. दिल्लीतील पंच्याऐंशी वर्षाची बलात्कारीत आजी आहे. शाळेच्या संस्थापकांचे लैंगिक अत्याचार अगतिकपणे सोसणारी बारावी पास झालेली स्त्री आहे. गोवाऱ्याच्या घरातील उपासाने मेलेली त्याची सून कुसूम आहे. बापाच्या संसाराचे ओझे स्वतःच्या खांद्यावर घेऊन स्वतःचे भावजीवन उद्ध्वस्त होतांना पाहणारी अगतिक मुलगी ओह. मरमर मरून संसार चालविणारी पण संसारात कोणतेही स्थान नसलेली काकी आहे. काकाला किडनी देऊन अस्ताला जाणारी अगतिक स्त्री आहे. सवत सोसणाऱ्या अगतिक स्त्रिया आहत. मौनाची संस्कृती भोगणारी छकुली आहे. जाती जपणाऱ्या महिलांनीच नग्न धिंड काढलेली दलित महिला आहे. वैभवात केवळ शोभेची वस्तू बनलेली श्रीमंत मैत्रीण आहे. प्रेमळ स्पर्शासाठी आसुसलेल्या बोरी–बाभळी आहेत. वेडयात काढली गेलेली आजीबाई आहे. एका निर्धारक्षणी पतीचे बंधने तोडून बाहेर पडलेली पण पुन्हा पतीच्या बंधनांनाच स्वातंत्र्य मानून परत फिरलेली शरणागता आहे. गरिबीचे नाते एका दिवशीच्या चांगल्याचुंगल्या जेवणासाठी न तोडणारी परिस्थितीवश स्त्री आहे. गर्भातच सुरी चालवू नका म्हणणारी परी आहे. दुसरीमागे लागलेल्या

नवऱ्यामुळे सैरभैर झालेली तुळशी आहे. हक्कांसाठी भांडणारी शेवंती आहे. या असंख्य बायकांची दुःखे पाहिल्यानंतर भारतीय समाजात बाईचे जगणे किती केविलवाणे आहे याची जाणीव होते.

कोणत्याही समाजाची सांस्कृतिक प्रतिष्ठा ही त्यांच्या जीवनपध्दतीतून प्रत्ययास येते. सृजनशक्तीचा वसा जपणाऱ्या स्त्रीला ज्या समाजात उपेक्षेचे जीवन जगावे लागते त्या समाजावर समाजातील पुरूषसत्ताक पध्दतीबाबत कवयित्रीचा संताप व्यक्त होतो.

1) ''सारे आभाळच फाटले ठिगळ कुठे कुठे लावणार? पण एकेकाच्या थोबाडात चपला कधी हाणाल?''
2) ''आता कोणातरी बाईच्या हातात तलवारच यावी तुमचे तोडण्यासाठी पाय!''
3) ''जबरदस्ती केली ती त्यांच्या लिंगात किडेच पडावेत''
4) ''आकाशातल्या पावसाला सुपारी देऊन

पुरूषांची चिरेबंद घरे उद्ध्वस्त करायची आहेत
पावसा! पावसा!! भन्नाटून ये, पिसाटून ये
या अहंकारी पुरूषांना निसर्गाची प्रचिती दे
स्त्रीच्या मूठभर गर्भाशयाचे आभाळभर
राजकारण करणारांना जमीनदोस्तच करून दे!''

कवयित्रीची वाणी कठोर आहे पण त्यांचा संताप खरा आहे. स्त्रीच्या जीवनात बदल व्हावा ही तळमळ सच्ची आहे. त्यामुळे कवयित्री आशावादी आहेत. त्या आपल्या 'वाटा' या कवितेत लिहितात,

''अंतर्मनाचा आवाज, नाकारण्याचे संपत नाही
टोपले झाले तरी, कोंबडा आवरायचा थांबत नाही.
.....
तुम्हीही वाटयाला आलेलंच
मुकाटयानं भोगाल तर
याद राखा! पुढील पिढी तुमचं
अस्तित्वही स्वीकारणारं नाही.''

बदलाचे प्रारंभ ठिकाण व्यक्तीच असते म्हणून कवयित्री लिहितात,

1) ''मुली स्वतः बदलतील तेव्हाच हे जग बदलेल
त्या जगणे ठरवतील तेव्हाच हे मृत्यू टळतील.''
2) ''स्त्रीच्या मनातील दबलेला स्व जोपर्यंत
बदलाचे दृढ आव्हान स्वीकारत नाही
तोपर्यंत या तुरूंगाच्या मजबुत भिंती
हादरविण्याची शक्ती स्त्रीमध्ये येणारचे नाही''

बदलाचे दृढ आव्हान स्त्रियांनी स्वीकारले पाहिजे व परिवर्तनाच्या प्रवाहाशी नाते जोडायला हवे त्याशिवाय स्त्रीची अस्मिता मुक्त होणार नाही. स्त्रीला माणूसपण नाकारणारी विषम समाजरचनेची चौकटच पार फेकून दिली पाहिजे. स्वतःला पुरूषी वर्चस्वातून मुक्त करणे गरजेचे आहे म्हणून कवयित्री पुढे लिहितात,

''जीर्ण मूल्ये बदलवून या चौकटीला काढाच मोडीत
जीवघेण्या कोंडमाऱ्यातून सुटका होईल निश्चित!''

हे जग बदलेल, स्त्री जागी होईल, ती संघर्ष करील, अन्याय काढून टाकील हा विश्वास कवयित्रीला आहे म्हणून त्या 'मुक्ती' या कवितेत लिहितात,

''दोन्ही हातांनी अडविला तरी
येऊ घातलेला बदल अडणार नाही
अनेकांच्या अंतःस्फोटातून आलेला
झंझावाती अविस्कार जंगलेल्या जुनाट
रूढींना कधीच भीक घालणार नाही.''

———

संदर्भ साधने

1. महात्मा फुले व स्त्रीमुक्तीचा विचार, गेल ऑमवेट
2. अब्राम्हणी स्त्रीवादी इतिहास, लेखनशास्त्र : संपा. विद्युत भागवत, प्रतिभा परदेशी
3. इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, डॉ. शांता कोठेकर
4. 'बाई', प्रस्तावना, डॉ. यशवंत मनोहर.
5. 'बाई', डॉ. सीमा साखरे
6. स्त्रीवादी समीक्षा व आयोजन, अश्विनी घोंगडे
7. गुंडी नीजिमा : संपादित स्त्रीमिती मॅजेस्टिक पुणे.
8. शरद पाटील संपा. 'स्त्रीवादी' विशेषांग 1982, धुळे.